# महाराष्ट्र राज्य विद्युत वितरण कंपनी मर्यादित
# ग्राहक तक्रार निवारण मंच
# कोल्हापूर परिमंडळ, कोल्हापूर यांचे समोर

ग्राहक तक्रार क्र. १०६–२०१०/ दिनांक :

| | |
|---|---|
| श्री. सुधिर सिंथेटीक्स ग्रुप,<br>प्रोप्रा. श्री. सुधीरजी गोयल, प्लॉट नं. २६–२९ आणि<br>४२–४५ लक्ष्मी इंडस्ट्रीयल इस्टेट, तिळवणी,<br>ता. हातकणंगले, जि. कोल्हापूर | अर्जदार |

**विरूध्द**

| | |
|---|---|
| १) कार्यकारी अभियंता (का.) तथा नोडल ऑफीसर,<br>म.रा.वि.वितरण कं.लि.,संवसु मंडळ कार्यालय,<br>मंडल कार्यालय, कोल्हापूर<br>२) कार्यकारी अभियंता<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>विभागीय कार्यालय, इचलकरंजी, जि. कोल्हापूर<br>३) सहाय्यक अभियंता,<br>म.रा.वि.वि. कंपनी मर्यादित,<br>ग्रामीण उप विभागीय कार्यालय, इचलकरंजी, जि. कोल्हापूर | विरूध्द पक्षकार |

<u>कोरम</u> :– १) श्री. बी.जी. पवार, अध्यक्ष,
२) श्री. जी.बी.पानकर, सदस्य–सचिव
३) श्री. जी.सी. लेले, सदस्य

<u>महाराष्ट्र राज्य विद्युत नियामक आयोग</u>
(ग्राहक तक्रार निवारण मंच)
विनियम २००६ मधील ८.२ चे तरतुदीनुसार

## <u>न्याय निर्णय</u>

श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव, ग्रा.त.नि.मंच, कोल्हापूर खालील प्रमाणे न्याय निर्णय देत आहेत.

श्री. सुधिर सिंथेटीक्स ग्रुप, लक्ष्मी इंडस्ट्रीयल इस्टेट, तिळवणी, ता. हातकणंगले हे महावितरणचे उच्चदाब ग्राहक असून पॉवरलूमसाठी वीज वापरतात. त्यांनी अ फॉर्ममध्ये तक्रार मंचाकडे दि. १५.५.२०१० रोजी केली आहे. त्यांना सध्या HT – Multi Partite टेरीफप्रमाणे वीज आकारणी होत असून ती HT/ LT – Multi Partite टेरीफप्रमाणे वीज आकारणी व्हावी अशी मागणी आहे.

त्यासाठी ग्राहकाने ' क्ष ' फॉर्ममध्ये अर्ज दि. ८.३.२०१० रोजी अंतर्गत ग्राहक तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांचेकडे दिला असून दि. ७.५.२०१० रोजी कक्षाने निर्णय दिला आहे. परंतु तो मान्य नसल्याने मंचाकडे अपील करण्यात आले आहे.

दि. ९.६.२०१० रोजी मंचासमोर तक्रारीची सुनावणी झाली. सुनावणीच्या वेळेस ग्राहकातर्फे श्री. सुधीर गोयल हजर होते. वि.प.कडून श्री. आडके, कार्यकारी अभियंता, कोल्हापूर मंडल, श्री. आहुजा, सहाय्यक अभियंता हे हजर होते. सदर तक्रारीवर वि.प.ने लेखी निवेदन दि. २५.५.२०१० रोजी सादर केलेले आहे.

ग्राहकाच्या मागणीनुसार मुख्य अभियंता (वाणिज्य) मुंबई यांनी पत्र क्र. ३५२१३ दि. ९.११.२००९ नुसार १५८० एच.पी. ऐवजी १५४० एच.पी. लोड कमी करण्यास मंजुरी दिली. ग्राहकाच्या मागणीनुसार बिलींग होण्यासाठी वि.प. यांनी मुख्य अभियंता (वाणिज्य) मुंबई यांच्याकडून मार्गदर्शन मागितले होते. त्यानुसार ग्राहकाने नवीन एच.टी. व एल.टी. असे विभागून प्रस्ताव नव्याने सादर करण्याबाबत अधीक्षक अभियंता, कोल्हापूर यांनी पत्र क्र. २२२७ दि. १२.३.२०१० ने तक्रारदारास कळविले आहे.

सुनावणीच्यावेळेस नवीन स्वतंत्र एच.टी.साठी कनेक्शन कसे देता येईल याची प्रत्यक्ष स्थळ तपासणी श्री. जी.बी. पानकर, सदस्य सचिव, ग्राहक तक्रार निवारण मंच, कोल्हापूर यांनी महावितरणच्या अधिकाऱ्यासोबत करणेचे ठरले. त्यानुसार दि. १२.८.२०१० रोजी प्रत्यक्ष भेट देवून संयुक्त तपासणी अहवाल दि. १८.८.२०१० रोजी मंचासमोर ठेवण्यात आला. दि. १८.८.२०१० रोजी फेर सुनावणीसाठी तक्रारदारास मंचातर्फे कळविले होते. परंतु तक्रारदार हजर नव्हते व वि.प.तर्फे श्री. आडके, कार्यकारी अभियंता व श्री. आहुजा, सहाय्यक अभियंता हजर होते. संयुक्त तपासणी अहवालानुसार, तक्रारदार यांना त्यांच्या कॉम्प्रेसर रुमच्या जवळील मोकळ्या जागेत ७०० एचपीचे स्वतंत्र एच.टी कनेक्शन घेणे शक्य आहे.

वरील वस्तुस्थितीचा विचार करतां, खालील प्रमाणे निर्णय देत आहोत.

## आदेश

१) अंतर्गत तक्रार निवारण कक्ष, कोल्हापूर यांनी दि. ७.५.२०१० रोजी दिलेला आदेश कायम करीत आहोत. तक्रारदाराने महावितरणने दि. १२.३.२०१० च्या पत्रानुसार कळविल्याप्रमाणे नवीन प्रस्ताव दाखल करावा.

२) प्रस्तावा प्रमाणे काम पूर्ण झाल्यानंतर महावितरणनेHT /LT Multi Partite प्रमाणे वीज आकारणी करावी.

३) खर्चाबाबत आदेश नाही.

४) सदर आदेशाची अंमलबजावणी केल्याचे महाराष्ट्र विद्युत नियामक आयोग (ग्राहक तक्रार निवारण मंच व विद्युत लोकपाल ) विनियम २००६ ८.७ नुसार वि.प. यांनी मंचास कळवावे.

५) या निर्णयाविरूध्द तक्रारदार यांना अपील करावयाचे असलेस त्यांना आदेशाच्या तारखेपासून ६० दिवसांचे आंत मा. विद्युत लोकपाल, केशवा, बांद्रा–कुर्ला कॉम्प्लेक्स, बांद्रा (पूर्व), मुंबई–५१ यांजकडे करता येईल.

दिनांक : ( जी. बी. पानकर )

सदस्य सचिव

श्री. बी.जी.पवार, अध्यक्ष :

श्री. जी. सी. लेले, ग्राहक सदस्य :

एकमताच्या / बहुमताच्या आदेशाची अंमलबजावणी करण्यात यावी.

( बी. जी. पवार )

अध्यक्ष

## Joint Inspection Report


M/s. Sudhir Synthetics Group, Laxmi Industrial Estate, village Tilavani, Tal: Hatkanangale has sumitted his appeal in ‘ A ‘ Form on 15/5/2010 to CGRF Kolhapur ( Case No. 106/10 ). The hearing on this appeal is taken on 9/6/2010. The consumer is demanding HT/LT Multi- partite tariff billing instead of existing H.T. Multi-partite billing.

During the hearing, Shi Adake, Executive Engineer, Kolhapur Circle has informed that the two separate proposal for HT & LT connection should be submitted by the consumer, as already informed.

It is decided to carry out the joint inspection of premises for feasibility to release another H.T. connection.

On date 12/8/2010, the joint inspection of premises is carried out by Shri G.B. Pankar, Member/ Secretary, CGRF, Kolhapur along with Shri P.K. Adake, Executive Engineer, Kolhapur Circle, Shri N.D. Ahuja, Asstt.Engineer and Consumer Representative.

Another H.T. connection for 700 HP ( 350 HP x 2 ) can be given near Compressor Room in available space. The sketch for tentative H.T. connection is given below :



| | | |
|---|---|---|
| ( G.B. Pankar ) | ( P.K. Adake ) | ( N.D. Ahuja ) |
| Member/ Secretary | Executive Engineer | Assistant Engineer |
| CGRF Kolhapur | Kolhapur Circle Office | Kolhapur Circle Office |